२ पुण्यनगरी

मंगळवार, ९ जुलै २०२४

# प्रणाली पाटील केंद्रीय सशस्त्र पोलीस दलामध्ये क्लासवन ऑफिसरपदी

**नवे पारगाव :** वाठार तर्फ वडगाव (ता. हातकणंगले) येथील प्रणाली रमेश पाटील हिची केंद्रीय लोकसेवा आयोगामार्फत घेण्यात आलेल्या सीएपीएफ एसी परीक्षेतून केंद्रीय सशस्त्र पोलीस दलामध्ये क्लासवन ऑफिसरपदी निवड झाली.

केंद्रीय लोकसेवा आयोगा मार्फत घेण्यात आलेल्या परीक्षेचा काल रात्री निकाल लागला. प्रणालीचे प्राथमिक शिक्षण वाठार येथील जिल्हा परिषदेच्या कन्या विद्यामंदिर, माध्यमिक शिक्षण किणी हायस्कूलमध्ये बारावीपर्यंतचे शिक्षण कोल्हापुरातील स्वामी विवेकानंद महाविद्यालयात झाले. यूपीएससीच्या अभ्यासासाठी प्रणालीने पुण्यातील सिद्धीविनायक महाविद्यालयात बी.ए.ची पदवी, तर भूगोल विषयातून एम.ए.ची पदवी सर परशुराम भाऊ महाविद्यालयात घेतली.



प्रणाली पाटील

किणी हायस्कूलमध्ये असताना विविध क्षेत्रांतील अधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनातून यूपीएससीतून अधिकारी व्हायचे स्वप्न पाहिले. त्यानुसार तिने पुढील शिक्षण घेतले. घरची आर्थिक परिस्थिती कमकुवत असल्याने दिल्लीला जाऊन क्लास घेणे तिला शक्य नव्हते. अध्यात्म गुरू नरेंद्राचार्य, चाणक्य मंडळ यांच्या प्रेरणेतून, सिनिअर आणि मित्र-मैत्रिणींच्या ग्रुप चर्चेतून आपल्याला हे यश मिळाल्याचे प्रणालीने सांगितले.